# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.</u>

## <u>जाहीर निविदा.</u>

जळगांव जिल्हयातील तमाम कार्यालयीन उपयोगितेची स्टेशनरी पुरवठाकारांना याद्वारे कळविण्यात येते की, याकामी ज्या पुरवठाकारांस खालील स्टेशनरी पुरविणेस स्वारस्य असेल त्यांनी आपले दरपत्रक भरुन बंद पाकिटातून, पाकीटावर <u>कार्यालयीन स्टेशनरीचे कोटेशन</u> असा उल्लेख करुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने बंद पाकीट करुन म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव, कक्ष कमांक 101 यांच्याकडेस <u>दि.10/02/2025</u> पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके <u>दि.11/02/2025</u> रोजी सकाळी 10.30 वाजता मा. जिल्हा न्यायाधीश–1, यांचे समक्ष त्यांचे निजीकक्षात उघडले जातील.

<u>कार्यालयीन उपयोगाकरीता खालील प्रमाणे स्टेशनरी उधारीवर खरेदी करावयाची आहे.</u>

| अ.क. | तपशील | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| 1 | टाचण्या बॉक्स | 100 बॉक्स |
| 2 | पेस्ट बॉटल (कॅमल 300 एम.एल.) | 50 नग |
| 3 | पांढरा दोरा बंडल उच्च प्रतिचा (4x1) | 50 बंडल |
| 4 | लाकडी टोचा (कोहिनूर कंपनीचा) | 20 नग |
| 5 | स्टॅम्प पॅड लहान निळे (कॅमल कंपनीचे) | 50 नग |
| 6 | स्टॅम्प पॅड शाई बॉटल 25 एमएल निळया रंगाचे (कॅमल कंपनीचे) | 50 बॉटल |
| 7 | झेरॉक्स पेपर (Reflection 75 GSM paper A4 Size) | 500 रिम |
| 8 | गुडनाईट लिक्वीड 45एमएल गोल्ड फॅश | 50 नग |
| 9 | स्पंजडबी (लहान आकाराची) | 50 नग |
| 10 | कोलीन बॉटल 500 एमएल | 20 नग |

### <u>सर्वसाधारण अटी</u>

1. दरपत्रक स्विकारल्यानंतर व पुरवठा आदेश प्रदान केल्यानंतर पाच दिवसांत उपरोक्त वस्तुंचा पुरवठा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथे स्वखर्चाने करावा लागेल. सदरील वस्तुंचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा नसल्यास स्विकाराला जाणार नाही.

2. दरपत्रक स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्याकडेस राखून ठेवला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

3. दरपत्रक सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जी.एस.टी.चा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस अधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल.

4. उपरोक्त वस्तु अनुदाना अभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार म.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

5. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

6. दरपत्रकातील दर दिनांक 31/03/2025 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा स्पष्ट खुलासा करावा.

7. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

VSKalkar 31/1/2025
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क./रोखशाखा/ 202 /2025.
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक : 31/01/2025.

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.
1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर